

**शीर्षक :  मराठी राजभाषा दिन**

मराठी भाषा आमच्या महाराष्ट्राची शान,

ऐकताच हरपून जाते भान.

' अ ' पासून सुरु होते अज्ञान,

' ज्ञ ' येईपर्यंत मिळते सर्व ज्ञान.

काना, मात्रा, वेलांटी यांची शान,

इतिहासातही आहे हिला मोठा मान.

मातृभाषा मराठी माझी भाषा,

जगात मान मिळवून देते अपुल्या देशा.

मराठी मातीत जन्मले खूप वीर,

मातीसाठी कित्येकांनी गमावले शीर.

वि.वा. शिरवाडकरांची प्रसिद्ध ययाती,

मराठी शब्द जोडतात नाती.

मराठी भाषेचा मला आहे गर्व,

जपूया ही संस्कृती आपण सर्व.

- कु. सावली सुधाकर देसाई
इयत्ता – सातवी / क
एस.एस.एल. इंग्लिश स्कूल, परेल मुंबई – १२



**शीर्षक : राष्ट्रीय विज्ञान दिन**

२७ फेब्रुवारीला करतो आपण
राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा
शास्त्रज्ञ सी. वी. रामनप्रमाणे
तुम्हीही विज्ञानाची कास धरा ॥

मिळवून नोबेल पारितोषिक
झाले ते खूप प्रसिद्ध
त्यांच्याप्रमाणे तुम्हीही ठेवा
वैज्ञानिक दृष्टीकोनाची जिद्द ॥

होते सी. वी. रमण
सगळ्यांसाठीच खूप खास.
त्यांच्यामुळे झाला भारताचा
वैज्ञानिक विकास ॥

राष्ट्रीय विज्ञान दिवसाला होतो
सी. वी. रमण यांच्यावर गर्व
राष्ट्रीय विज्ञान दिन
साजरा करू मिळून सर्व ॥

- हर्षी जिनेश नंदू

इयत्ता : सातवी / अ

एस.एस.एल.इंग्लिश स्कूल, परेल मुंबई १२



**शीर्षक : मराठी राजभाषा दिन**

माय मराठी शान मराठी
अभिमान बोलतो मराठी,
अमृताहुन गोड असे
आमुची वाणी मराठी

संतवाणी भारुडे अभंगे
अविर यांची गोडी,
त्यांच्या शिकवणीतून मिळाली
ज्ञान संस्काराची जोडी

बालपणीचा काळ सुखाचा
साथ होती कवितांची,
आजीच्या गोवटीमधून
फुलली रात्र स्वप्नांची

अफाट सागर साहित्यांचा
ज्याचा गर्व असे आम्हाला,
माझ्या मराठीची तोड
अन्य नसे कोणाला.

असा मराठी भाषेचा
बाळगूया थोडा गर्व,
मराठी राजभाषा दिन
आनंदाने साजरा करूया सर्व.

- कु. शिवांश जैतापकर
इयत्ता : सहावी / अ
एस.एस.एल.इंग्लिश स्कूल, परेल मुंबई १२.



## शीर्षक : मराठीची महती

मराठी राजभाषा माझी,
जशी वित्तहाकलची वारी.
दिन सोनियाचा असे तो,
तारीख २७, महिना फेब्रुवारी.

भाषा आमुची, मान आमुचा,
जसा तिरंगा मान देशाचा.
सह्याद्रीच्या खुशीत गाजते,
मराठी भाषा म्हणून मिरवते ॥

तिला नाही जात-पात ,
तिला नाही गर्व अभिमान.
शिवरायांचे दान देवा,
माझ्या मराठीचा हाच ठेवा ॥

असंख्य मर्द मराठे,
तिच्या कुशीतच जन्मले,
पिकांतून पीक डोलते मराठी
तिनेच सर्व जना पोसले ॥

माझ्या मराठीची हि गोडी,

या चाखावयास सारेजण.

माझी मराठीच जपते,

माणसातले माणुसकीपण ॥

गर्व मला माझ्या भाषेचा,

जपतो मी तिचा वारसा.

हवीहवीशी भाषा माझी,

स्वच्छ निर्मल जणू तो आरसा ॥

- कु. ओम सद्‌गुरू सावंत

इयत्ता : सहावी / ब

एस.एस.एल.इंग्लिश स्कूल, परेल मुंबई १२.



**शीर्षक : माय मराठी**

मराठी असे आमुची मायबोली

ज्ञाना तुकोबांनी समृद्ध केली

विद्येचा दिप उजळतो अंधारात वाती

साऱ्या विश्वात श्रेष्ठ मराठी माती||१||

दिला जन्म तिने थोरा मोठ्यांना

मराठीचं बाळकडू दिलं या ओठांना

कुणी म्हणे तिला इंग्रजीची सवत

तिच आहे महाराष्ट्राची दैवत||२||

पुणे कोल्हापूर सातारा सांगली

मराठी मज माय म्हणून लाभली

शब्द, अक्षरे ग-म-भ-न साधी बोली

मराठीची मान नका झुकवू खाली||३||

हाय, गुड मॉर्निंग म्हणताना

फार सुशिक्षित वाटतं

नमस्कार , शुभ सकाळ म्हणताच

चेहऱ्यावर हसू का उमटतं||४||

सर्व भाषांचा आदर करावा

मनात मराठीचा निरादर नसावा

मायमराठीचा उरी गर्व बाळगावा

सातासमुद्रापार तिचा झेंडा फडकवावा||५||


- कु.ग्रीष्मा प्रमोद पाताडे.

इयत्ता : सहावी /क

एस.एस.एल.इंग्लिश स्कूल, परेल मुंबई १२



**शीर्षक : माय मराठी**

माय मराठी भाषा आमुची
साय जणू ती दुधावरची
सात समुद्रापार बहरते
अभिमानाने माय मराठी

शिवबाच्या शौर्यात मराठी
मावळ्यांची गर्जना मराठी
अटकेपार रोवूनी झेंडा
तिथेही नांदे माय मराठी

तुकयाचे अभंग मराठी
वाणी ज्ञानोबाची मराठी
दासबोध अन् श्लोक मनाचे
पावन करीते माय मराठी

- कु. स्मिनित म्हात्रे.
इयत्ता : पाचवी / ब
एस.एस.एल.इंग्लिश स्कूल, परेल मुंबई १२.



## शीर्षक: मी मराठी

मराठी भाषेचा महाराष्ट्र, मराठी महाराष्ट्राची भाषा
राजे आणि महाराजे, दीन दुबळ्यांची ही आशा
अशा या भाषेची महती तुम्हांला सांगेन
ऐका ऐका हो सगळे आज मराठी भाषा दिन

गोडवा येईन मुखात बोलता मराठी भाषा
राजभाषा ही अमुची, बघूनी घ्या दाही दिशा
चहु बाजूंनी जुळते वाकविली तशी वाकिन
ऐका ऐका हो सगळे आज मराठी भाषा दिन

मायबोली ही माझी वारसदार आहे महात्म्यांची
ग्रंथ,कविता आणि संग्रह, गाथा सांगतात हुतात्म्यांची
माय बाप माझे मराठी तिजविन व्यर्थ हे जीवन
ऐका ऐका हो सगळे आज मराठी भाषा दिन

- कु. याशिका धीरज तायडे.
इयत्ता - पाचवी / क
एस.एस.एल.इंग्लिश स्कूल, परेल मुंबई-१२